## अधिसूचना

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- ३१ ऑक्टोबर, १९९८.

क्रमांक : एमएटी–१०९६/प्र.क्र. ९/९८/३८.

प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५ [१९८५ चा अधिनियम क्रमांक १३] याच्या कलम ३६ च्या खंड [अ] आणि [क] द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण [वित्तिय आणि प्रशासकीय अधिकार] नियम, १९९१ मध्ये सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्र शासन पुढील नियम करीत आहे, ते असे ;

१. या नियमांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण [वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार] [सुधारणा] नियम, १९९८ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण [वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार] नियम, १९९१ मधील नियम ४ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :-

"४. अध्यक्षाचे वित्तीय आणि प्रशासकीय अधिकार –

शासनाच्या विविध वित्तीय आणि सेवा नियमान्वये शासनाच्या प्रशासकीय विभागाला जे अधिकार प्रदान केलेले आहेत तसेच अधिकार अध्यक्षांना असतील :

परंतु, वित्तीय अधिकारांचा वापर या अधिनियमाच्या किंवा संबंधित नियमांच्या तरतुदीशी विसंगत नसलेल्या, शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणा–या कोणत्याही कार्यपध्दती विषयक किंवा अन्य सूचनांच्या अधीन राहून करण्यात येईल.

आणखी असे की, अध्यक्षांच्या अखत्यारीत नसलेल्या बाबींच्या संबंधात, वित्त विभागाची किंवा अन्य कोणत्याही

[....२/-]

प्राधिकरणाची सहमती शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत अध्यक्षांना मिळवावी लागेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. भा. सावंत
शासनाचे उप सचिव.

---

क्रमांक:एमएटी १०९६/प्र.क्र. ०९/९८/३८,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३१ ऑक्टोबर,१९९८.

प्रति :-

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई [पत्राने],
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई [पत्राने],
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, (पत्राने)
महालेखाकार, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई,
महालेखाकार, महाराष्ट्र-१ [लेखा परिक्षण], मुंबई,
महालेखाकार, महाराष्ट्र-२ [लेखा व अनुज्ञेयता], नागपूर,
महालेखाकार, महाराष्ट्र-२ [लेखा परिक्षण], नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई [ २ प्रती ],
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने/कक्ष,

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

त्यांना विनंती करण्यात येते की, अधिसूचना महाराष्ट्र राज्य राजपत्र असाधारण भाग ४-अ मध्ये प्रकाशित करून अधिसूचनेच्या १०० प्रती या विभागाकडे पाठविण्यात याव्यात.

निवड नस्ती.

(शा. भा. सावंत)
श. भा. सावंत
शासनाचे उप सचिव.

सुषमा/२११९८.